मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८१, २८१९२८२८.

जा.क्र.मनपा/कर/ ८० /२३-२४ दि. २७/७ /२०२३

# आदेश

संदर्भ :- १) प्रशासकिय सभा ठराव क्र. २०० दि. ०६/०२/२०२३.
२) जा.क्र.मनपा/कर/४०५०/२२-२३ दि. १०/०२/२३ रोजीचे आदेश.

ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी/ बिगर निवासी मालमत्ता खरेदी-विक्री करारनामा/ वारसा हक्क अंतर्गत मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता दि. ०६/०२/२०२३ रोजीच्या प्रशासकिय सभेत ठराव क्र. २०० अन्वये मालमत्ता हस्तांतरण शुल्कात वाढ करणे करीता मान्यता दिलेली असून त्यानुसार जा.क्र.मनपा/कर/४०५०/२२-२३ दि. १०/०२/२३ रोजीचे आदेशानुसार दि. १०/०२/२३ पासून नवीन दरानुसार हस्तांतरण शुल्काची आकारणी करण्यात येते.

ज्याअर्थी, मालमत्ता हस्तांतरण करताना विक्री केलेल्या मालमत्ता धारकाने स्वतःच्या नावे हस्तांतरण केलेले नसल्याने खरेदीदार मालमत्ता धारक साखळी करारनामा सादर केले जाते. परंतु उक्त प्रकरणी विक्री केलेल्या मालमत्ता धारकाने मालमत्ता हस्तांतरण करताना स्वतःच्या नावे मालमत्ता केले नसल्याने त्याची हस्तांतरण फी महानगरपालिकेस प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

त्याअर्थी, दि. ०१/०४/२०२३ पासून प्राप्त झालेल्या हस्तांतरणाच्या प्रकरणांमध्ये जे मालमत्ता धारक साखळी करारनामाची प्रत सादर करतील अथवा साखळी करारनामा आहे अशा प्रकरणामध्ये मालमत्तेच्या देयकात असलेल्या मालमत्ता धारकाचे नाव ते अर्जदार पर्यंत जेवढे साखळी करारनामे सादर केले जातील त्या करारनामास यापूर्वी जी हस्तांतरण फि निश्चित करणेत आली होती ती प्रती करारनामा रु. १०००/- (निवासी मालमत्ता) व रु. १५००/- (बिगर निवासी) याप्रमाणे फी रक्कम सद्यस्थितीतील अर्जदार यांचेकडुन अतिरीक्त वसूल करावी व दि. १०/०२/२०२३ नंतर प्राप्त अर्जासाठी जा.क्र.मनपा/कर/४०५०/२२-२३ दि. १०/०२/२३ रोजीचे आदेशानुसार कागदपत्रांची सुची व दर वसुल करुन मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करावी.

(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)

(अनिकेत मानोरकर)
अतिरीक्त आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१) उप-आयुक्त (कर)
२) सहा. आयुक्त (कर)
३) सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी
प्रभाग क्र. १ ते ६